प्रेस नोट    पुणे, दिनांक-२८/०९/२०१८.

**आलोसे १)श्री.सुरेश नामदेव अंबुलगेकर,व्यवसाय नोकरी,संचालक विस्तार शिक्षण व साधन सामुग्री, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, पुणे (वर्ग-१) मुळ रा. मु.पो.मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड, २) आलोसे यांची पत्नी मंगाराणी सुरेश अंबुलगेकर, ३)आलोसे यांचा मुलगा नितीन सुरेश अंबुलगेकर यांचे विरुध्द् अपसंपदेचा गुन्हा दाखल झालेबाबत.**

---

यांतील आरोपी लोकसेवक श्री. सुरेश नामदेव अंबुलगेकर,व्यवसाय नोकरी,संचालक विस्तार शिक्षण व साधन सामुग्री, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भोसले नगर, पुणे (वर्ग-१) यांचे विरुध्द्चे सदर मालमत्तेच्या उघड चौकशीचा परिक्षण कालावधी हा माहे जुलै १९८० ते जुन २०१४ असा ग्राहय धरुन उघड चौकशी केली असता सदर चौकशीमध्ये सदर परिक्षण कालावधीतील श्री. सुरेश नामदेव अंबुलगेकर, यांचे व त्यांचे कुटुंबीयांचे एकूण उत्पन्न १,२१,००,७९२/-रुपये असल्याचे सिध्द् होत आहे. गै.अ.श्री. सुरेश नामदेव अंबुलगेकर यांची व त्यांचे कुटुंबीयांची एकूण १,८९,२२,१२२/-रुपये मालमत्ता असल्याचे सिध्द् होत असुन परिक्षण कालावधीत अखेर एकूण १,५५,१५,४२६/-रुपये (-१२८%) इतकी अपसंपदा धारण केल्याचे निष्पन्न झाले आहे. व सदर अपसंपदा धारण करणेसाठी त्यांच्या पत्नी मंगाराणी सुरेश अंबुलगेकर व त्यांचा मुलगा नितीन सुरेश अंबुलगेकर सर्व मुळ राहणार- मु.पो.मुखेड, ता.मुखेड, जि.नांदेड यांनी श्री. सुरेश नामदेव अंबुलगेकर, यांचेशी संगनमत करून त्यांना अपप्रेरणा दिली असल्याचे निष्पन्न झाल्याने सदरबाबत मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री संदीप दिवाण व मा.अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक श्री. दिलीप बोरस्ते यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुहास मधुकर नाडगौडा यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक-२६/०९/२०१८ रोजी १४.३७ वाजता बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणेशहर, येथे गुन्हा नोंद क्रमांक-२७५/२०१८, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम,सन-१९८८चे कलम १३(१)(ब) आणि भा.दं.वि.सं.कलम १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आलेला असुन त्याअनुषंगाने आरोपी लोकसेवक श्री. सुरेश नामदेव अंबुलगेकर यांचे चौकशीमध्ये नांदेड लातुर औरंगाबाद येथे मिळुन आलेल्या मालमत्ते संदर्भात पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री.संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. **हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४**
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे-
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज- **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट- **www.acbmaharashtra.gov.in**
८. **Mobile App - www.acbmaharashtra.net**

(सुहास नाडगौडा)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबधक विभाग,पुणे.